# ‘महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे सामाजिक आणि शैक्षणिक कार्य: समाजशास्त्रीय अध्ययन’

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील आचार्य (पीएच. डी.) पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंध आराखडा


**संशोधक**

**राजेंद्र रामचंद्र गव्हाणे**

मोतीलाल हरगोविंददास महाविद्यालय, ठाणे {प.}

**मार्गदर्शक**

**प्रा. डॉ. बिभीषण करे**

सहाय्यक प्राध्यापक आणि समाजशास्त्र विभागप्रमख

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.


डिसेंबर २०१७

**प्रस्तावना :**

भारताच्या सामाजिक सुधारणेच्या चळवळीत महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे स्थान सर्वश्रेष्ठ समजले जाते. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी आपले संपूर्ण आयुष्य स्त्री शिक्षण व स्त्री—उद्धारासाठी खर्च केले आहे. महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या स्त्री उद्धाराच्या कार्यामुळेच 'महर्षी धोंडो केशव कर्वे म्हणजे स्त्रीयांची उन्नती' हे समीकरण संपूर्ण देशात मान्यता पावले होते. आयुष्यभर त्यांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी केलेल्या कार्याचा यथायोग्य गौरव करण्यात आला. पुणे व बनारस हिंदू विद्यापीठाने बहुमानदर्शन त्यांना 'डी.लिट' ही सन्माननीय पदवी देऊन १९५१साली त्यांच्या कार्याचा गौरव केला. भारत सरकारने १९५५ साली 'पद्मविभूषण' आणि १९५८ साली 'भारतरत्न' या किताबाद्वारा त्यांच्या कार्याचा बहुमान केला.

महर्षी कर्वे यांचे जीवन म्हणजे सर्वसामान्यपणे सामाजिक सुधारणेसाठी आणि विशेषत: स्त्री शिक्षणासाठी वाहिलेले आधुनिक ऋषींचे जीवन होय. त्यांच्या जीवनाची गाथा ही आकर्षक व प्रेरणा देणारी आहे. चांगुलपणा, सौजन्य आणि साधुत्वाचे गुण त्यांच्या व्यक्तिमत्वात होते. स्त्रीचा उध्दार झाल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही, ही त्यांची धारणा होती. त्यांनी महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची स्त्रियांच्या सर्वांगीण प्रगतीची चळवळ गतिमान केली.

महाराष्ट्रात विधवांचा प्रश्न फार जटिल होता. बालविवाहामुळे बऱ्याच मुली अल्पवयात विधवा होत त्यांना पुर्नविवाह करण्याचा अधिकार नव्हता. त्यांना संपूर्ण आयुष्य वैधव्यात घालवावे लागत असे. ब—याच वेळा अत्याचार सहन करावा लागे. स्त्री शिक्षणाविषयक कार्यामध्ये महिलाश्रमाची स्थापना, महिला विदयालयांची स्थापना, ग्रामीण स्त्री शिक्षण, परदेशातील दौरे, निष्काम कर्ममठ, महिला विदयापिठाची स्थापना, अनाथ बालिकाश्रम इत्यादी.

महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या सामाजिक कार्यांमध्ये विधवा पुनर्विवाहविषयक कार्यांचा समावेश होतो. स्वत:पासून कार्याची सुरुवात केली. विधवा विवाह उत्तेजक मंडळ, अनाथ बालिका आश्रम किंवा अनाथ महिलाश्रमाची स्थापना, महर्षी कर्वे यांच्या कार्याचा अभ्यास केला.

**अध्ययन विषयाची निवड आणि महत्व:**

भारतातील समाजसुधारणांच्या चळवळीच्या इतिहासात महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे स्थान उच्च दर्जाचे आहे. महर्षी धोंडो केशव कर्वे म्हणजे 'स्त्रियांची उन्नती' हे समीकरण महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतात मान्यता पावले आहे. महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे जीवन म्हणजे सर्वसामान्यपणे सामाजिक सुधारणेसाठी आणि विशेषत: स्त्री शिक्षणासाठी वाहिलेले आधुनिक जीवन होय. त्यांच्या जीवनाची गाथाही आकर्षक व प्रेरणा देणारी आहे. परंतु त्यांच्या कार्यात योग्य न्याय मिळाला नसल्याची खंत त्यांच्या एकुणच कार्यप्रणालीवरुन मला एम.ए. पासुनचे वाटत आले होते. शोधकर्ता या नात्याने भारतातील समाजसुधारकांच्या चळवळीवर प्रकाश टाकण्यासाठी मी या विषयावर निवड केली आहे तसे पाहीले तर महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या जीवनकार्याचा मी नेहमीच वाचक राहीलो आहे. त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यावर संशोधन करण्यासाठी ''**महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे सामाजिक आणि शैक्षणिक कार्य: एक समाशास्त्रीय अध्ययन**'' हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

जगात स्त्रीमुक्ती चळवळीने स्त्रीयांना त्यांचा आत्मविश्वास परत मिळवुन देण्याचे काम निश्चित केले आहे. पण आता या मुक्ती, स्वातंत्र्य या कल्पनांच्या पुढे जावुन आत्मसाक्षात्काराचा मार्ग स्त्रीयांनी निवडावा असे विचार अभ्यासातुन पुढे येतात यासाठी मुळात स्त्रीप्रश्न निर्माण का होतो, यांच्या मुळापासुन शोध घेणे गरजेचे ठरते, म्हणुन सध्याच्या स्त्रीयांना भेडसावणा—या समस्यांवर शास्त्रीय अभ्यास होणे गरजेचे आहे. विचार हे मानवाचे प्रमुख लक्षण आहे. आणि चिंतन हे विचाराचे उगम स्थान आहे. सामाजिक विचार हे समाजातील समस्या, घटना तसे व्यवस्थेसंबंधी केलेले विचार आहेत. महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक सुधारात्मक कार्याचा आढावा घेण्यासाठी त्यांचे चिकित्सकपणे अभ्यास करणे गरजेचे आहे. महर्षी धोंडो केशव कर्वे म्हणजेच 'स्त्रीयांची' उन्नती हे समीकरण महाराष्ट्रातच नाहीतर संपूर्ण भारतातच मान्यता पावल्या आहेत. त्यांनी संपूर्ण आयुष्य स्त्री शिक्षणासाठी, स्त्री उध्दारासाठी खर्च केले. म्हणून भारत सरकारने 'भारतरत्न'पदवीने त्यांचा गौरव केला आहे. अशा समाजसुधारकांच्या जीवन कार्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुत विषयांचे आगळे वेगळे महत्व आहे.

**संशोधन अभ्यासाची उद्दीष्टे:**

१. महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या जीवनचरित्राचे समाजशास्त्रीय अध्ययन करणे.
२. महषी धोंडो केशव कर्वे यांच्या समकालीन समाजपरंपरा आणि परिस्थितीचे अध्ययन करणे
३. महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे सामाजिक सुधारणावादी कार्य अभ्यासणे.
४. महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या शैक्षणिक सुधारणेसंदर्भातील योगदान आणि कार्याचे अध्ययन करणे.
५. महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे सामाजिक आणि शैक्षणिक कार्याच्या परिणामाचे विश्लेषणात्मक अध्ययन करणे.

**संशोधनाची गृहित कृत्ये:**

संशोधन विषयाची निवड झाल्यावर अध्ययन विषयाशी संबधीत गृहितकृते निश्चित करावे लागतात. प्रस्तुत विषयाची व्याप्ती आणि मर्यादा लक्षात घेवून खालील काही गृहितकृत्ये निश्चित करण्यात आली आहेत.

१. महर्षी धोंडो केशव कर्वे यांची समकालीन समाज परंपरा आणि समाजपरिस्थिती समाजसुधारणा आणि प्रगतीच्या मार्गातील प्रमुख अडचण दिसते.
२. महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे भारतीय स्त्रीयांच्या सामाजिक विकासात भरीव योगदान आढळते.
३. महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या शैक्षणिक कार्यामुळे भारतीय स्त्रीयांची शैक्षणिक प्रगती झालेली दिसते.
४. भारतीय समाजसुधारणेत महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे योगदान प्रभावशील दिसते.
५. महर्षी धोंडो केशव कर्वे हे आधुनिक भारतातील कर्ते समाजसुधारक होते.

**पूर्व संशोधित साहित्याचे परिक्षण –अध्ययन**:

भारतात समाज सुधारकांची एक वैभवशाली परंपरा आहे. आधुनिक भारताच्या उभारणीमध्ये समाज सुधारकांचे योगदान खुप महत्त्वाचे आहे. यामध्ये भारतीय स्त्रीयांच्या सामाजिक व शैक्षणिक सुधारणांमध्ये महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे योगदान खुप महत्त्वाचे आहे. या योगदानाची दखल भारतातील आणि जगातील अनेक नामांकित समाजशास्त्रज्ञ आपल्या लेखनातून घेतलेले आहे. त्यामध्ये अनेक विचारवंतानी महर्षी धोंडो केशव कर्वे

यांच्या जीवनावर व कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या महत्त्वपुर्ण लिखाण केलेले आहे. यात धोंडो केशव कर्वे यांचे आत्मवृत्त (१९५८) गणेश लक्ष्मण चंदावरकर (१९७४) डॉ. इरावती कर्वे (१९५८) सौ. आनंदीबाई कर्वे (१९९८) सौ. सुधा चाफेकर (१९९५) डॉ. शैलेश त्रिभुवन (२००६) डॉ. निला पांढरे (२००६) प्रा. नारायण महादेव पटवर्धन (१९५८) डॉ. मनोहर नेने (२००५) विलास खोले (२००८) सौ. मालतीबाई देशपांडे (२००७) यांचे संशोधनात्मक लिखाण महत्त्वपुर्ण आहे. या संशोधनात्मक लिखाणाचा आधार घेउन शोधकर्ता संशोधनाचे कार्य पूर्ण करणार आहे.

**गणेश लक्ष्मण चंदावरकर** (१९७४) यांनी महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या जीवनाच्या कार्याची व त्यांच्या महनीयतीची ओळख व्हावी आणि स्त्रियांची आजची प्रगतीपथावर वाटचाल चाललेली आहे. तिला आधारभूत असणारे, पायाभूत असणारे कर्वे यांचे परिश्रम, यथार्थपणे मांडला आहे.

**मंगला आठलेकर** (१९९९) यांनी शिक्षणाने स्त्री स्वावलंबी बनेल या विश्वासाने स्त्री शिक्षणाचा आग्रह धरणारे आणि त्यासाठी आपल सारं आयुष्य वेचणारे महर्षी धोंडो केशव कर्वे स्त्री आज थोडाफार मोकळेपणाने जगत असेल तर त्या श्रेयात महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा वाटा मोठा आहे.

**डॉ. शैलेश त्रिभुवन** (२००६) यांनी महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या जन्म आणि कुळापासून ते वार्धक्य व देहावसान पर्यंत सविस्तर पणे लिखाण केलेले आहे. यामध्ये त्यांच्या सामाजिक कार्याचे वास्तविक अध्ययन आढळते.

**डॉ. नीला पांढरे** (२००७) महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या जीवनपटांचे अनेक शंभर वर्षाच्या भरगच्च आयुष्यात स्त्रियांना सन्मानपूर्वक जगता यावे. यासाठी त्यांनी अधिक पर्यंत केले. विधवेशी पुनर्विवाह करण्याची क्रांतिकारक घटना, विधवा विवाहोत्तेजक मंडळाची स्थापना, अनाथ बालीकामश्रमाची स्थापना, महिला विद्यापीठाची स्थापना हे त्यांच्या कार्यातले महत्त्वाचे टप्पे आहेत.

**विलास खोले** (२००८) यांनी महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या जीवनाचे व कार्याचे वेगळेपण अनेक प्रकारांनी सांगता येईल, यांचे बालपण, शिक्षण, नोकरी, त्यांच्या कार्याची दिशा, कार्य पूर्तीसाठी त्यांनी केलेली हालचाल स्त्री शिक्षणाच्या कामात त्यांना आलेले यश

आणि भारतरत्न या सर्वोच्च सन्मानापर्यंत झालेला त्यांचा जीवनप्रवास यथार्थपणे मांडला आहे.

धोंडो केशव कर्वे यांचे आत्मवृत्त व चरित्र यांचे लेखक **नारायण महादेव पटवर्धन** यांच्या मते, 'भारतातील आद्यसमाजसुधारकांमध्ये कर्वे यांचे नाव अग्रक्रमाने घेणे आवश्यक आहे, कारण अनाथ बालिका आणि महिलांसाठीचे कर्वे यांचे कार्य अनन्य साधारण असेच आहे.'

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत विषयाचे संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक संशोधन पध्दतींचा अवलंब शोधकर्त्याकडून केला जाणार आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :—**

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय ''महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा: एक समाशास्त्रीय अध्ययन'' अशा स्वरूपाच आहे. सदरील संशोधनात महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्यात येणार आहे. ही या संशोधनासाठी संशोधनाची मर्यादा सांगता येईल.

**तथ्य संकलनाची पद्धती :**

सामाजिक संशोधनाचा विषय निश्चित केल्यानंतर संशोधकाला त्या संशोधनासंबधी माहिती व तथ्यसामग्री संकलन करावी लागते. त्यासाठीच्या साधारण दोन पध्दती आहेत. त्याम्हणजे प्राथमिक स्त्रोत आणि द्वितीयक स्त्रोत होत. '' महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे सामाजिक आणि शैक्षणिक कार्य: एक समाशास्त्रीय अध्ययन'' या प्रस्तुत विषयांच्या संशोधनासाठी **द्वितीयक स्त्रोत किंवा तंत्रे** (Secondary Source) अवलंबण्यात येणार आहेत. महर्षी धोडो केशव कर्वे यांनी स्वत: लिहिलेले ग्रंथ, वृत्तपत्रातील त्यांचे लेखन, लेख, कागदपत्रे, जीवनचरित्रे, संस्मरणे, आठवणी, सार्वजनिक पत्र, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, फोटो, पुस्तके आणि संग्रहित काही लिखित साहित्याचा आधार घेतला जाणार आहे.

**तथ्य विश्लेषण  आणि निर्वचन प्रक्रिया:**

प्रस्तुत संशोधन विषयांच्या अनुषंगाने जी माहिती संकलित करणार आहे, त्या माहितीच्या आधारे वस्तुनिष्ठपणे महर्षी कर्वे यांची समकालीन समाजपरिस्थिती आणि घडून आलेले परिवर्तन यांचा तटस्थ आणि निरपेक्ष अध्ययन करण्यावर संशोधकाचा भर असणार आहे. माहिती संकलनानंतर पुरावे, दाखले व इतर उपलब्ध साहित्याचा आधार घेवून माहितीचे विश्वसनीय आणि अचूक विश्लेषण करण्याचा प्रयत्न शोधकर्ता करणार आहे.

**प्रकरण विभागणी**

**प्रकरण पहिले — प्रस्तावना**

प्रस्तुत प्रकरणात विषयांची निवड, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधन विषयांचे महत्त्व, संशोधन अभ्यासाची उद्‌दीष्टे, गृहितकृत्ये, आणि पद्धतीशास्त्राचे स्पष्टीकरण केले जाईल. तसेच संशोधन विषयाशी संबधीत पूर्व प्रकाशित व संशोधित साहित्य आणि लिखित—संग्रहित साहित्याचे अध्ययन करण्यात येणार आहे. याबरोबरच महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे कार्य—विचारप्रणाली आणि समाजशास्त्रातील सिद्धांत यांतील अन्वयार्थ अभ्यासण्याचा संशोधकाचा प्रयत्न राहणार आहे. सामाजिक संशोधनात तथ्य आणि सिद्धांत यांचा सहसंबध असतो. गुणात्मक {Qualitative} आणि मौलिक {Fundamental} संशोधनाद्वारे सामाजिक विचारांचा तटस्थ अभ्यास करण्यावर संशोधकाचा भर असेल.

**प्रकरण दुसरे — महर्षी धोंडो केशव कर्वे आणि समकालीन समाजसंरचना व परिस्थिती**

सदरील प्रकरणात महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या समकालीन समाजातील समाजपरंपरा, चालीरीती, प्रथा, सांस्कृतिक मुल्ये आणि परिस्थितीचे अध्ययन करण्यात येणार आहे. तत्कालीन सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थितीचा, स्त्रियांच्या स्थिती याबाबी या प्रकरणात अभ्यासल्या जाणार आहेत.

**प्रकरण तिसरे — महर्षी धोंडो केशव कर्वे: जीवन इतिहास व परिचय**

सदरील प्रकरणात शोधकर्त्याद्वारे महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा जन्म, बालपण, शिक्षण, प्रभाव आणि त्यांचा जीवनइतिहास यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

**प्रकरण चौथे — महर्षी धोंडो केशव कर्वे: सामाजिक कार्ये**

प्रस्तुत प्रकरणात महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे विधवा पुनर्विवाह आणि विधवा पुर्नवसन, विधवा विवाह उत्तेजक मंडळ, अनाथ बालिका आश्रम याद्वारे महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी केलेल्या समाजसुधारणावादी कार्याचे समाजशास्त्रीय चिकित्सक असे अध्ययन केले जाणार आहे.

**प्रकरण पाचवे — महर्षी धोंडो केशव कर्वे व शैक्षणिक कार्ये**

या प्रकरणांमध्ये महिला आश्रमाची स्थापना, महिला विद्यालयांची स्थापना, ग्रामीण स्त्री शिक्षण, विधवा शिक्षण, महिला विद्यापीठांची स्थापना, एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, प्राथमिक शिक्षण मंडळ, समता संघ, निष्काम कर्ममठ याद्वारे महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचे मुल्यमापन आणि वस्तुनिष्ठ अध्ययन केले जाणार आहे.

**प्रकरण सहावे— निष्कर्ष व सारांश विवेचन—**

शास्त्रीय व सखोल पध्दतीने संशोधन करून प्रस्तुत शोधप्रबंधाच्या या शेवटच्या प्रकरणांत महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे योगदान आणि समाजसुधारणा संबधीच्या विचारांची मांडणी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून करण्यात येणार आहे. अचूक, तटस्थ आणि निरपेक्षपणे निष्कर्षाची मांडणी करण्यावर संशोधकाचा भर राहिल. अध्ययनाअंती प्रस्तुत संशोधन आणि सिद्धांताचा सहसंबध अभ्यासणे, गृहितकृत्याची सत्यअसत्यता पाहणे, विविध चलांतील सहसंबधाचा अभ्यास करणे या बाबी प्रस्तुत प्रकरणात मांडण्या जातील.

**परिशिष्टे व छायाचित्रे:**

**संदर्भग्रंथसूची**


देशमुख, अनंत {२००९}, *'र. धो. कर्वे'*, मैत्रेय प्रकाशन, मुंबई.

पटवर्धन, नारायण {१९५८}, *'धोंडो केशव कर्वे आणि आत्मवृत्त व चरित्र*, हिंगणे शिक्षण संस्था, पुणे.

चंदावरकर, गणेश, {१९७४}, *'आधुनिक भारताचे शिल्पकार*, धोंडो केशव कर्वे,' माहिती व नभोवाणी मंत्रायल, न्यू दिल्ली.

कर्वे, इरावती {१९५८}, *' आजोबा'*, सत्यकथा शारदा प्रकाशन, पुणे.

चाफेकर, सुधा {१९९५}, *'मराठी कन्यांचा कल्पवृक्ष— महर्षी धोंडो केशव कर्वे,'* चंद्रकला प्रकाशन,पुणे.
त्रिभुवन, शैलेश {२००६}, *' भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे,'* पायल प्रकाशन, पुणे.
पांढरे, निला {२००७}, *'महर्षी धोंडो केशव कर्वे,'* उन्मेष प्रकाशन, पुणे.
आठल्येकर, मंगला {१९९९}, *'महर्षी ते गौरी,'* राजहंस प्रकाशन, पुणे.
नित्सुरे, य. गो. {१९५८}, *'भाग्यवान शतायुषी,'* व्हिनस प्रकाशन, पुणे.
मोडक, विश्वनाथ {१९५६}, *'हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेची साठ वर्ष,'* हिरकमहोत्सव, पुणे.
कुलकर्णी, सु. ध. {२०१०}, *'भारतरत्न धोंडो केशव कर्वे,'* मंगेश प्रकाशन, पुणे.
बापट, दिवाकर {१९७१}, *'उपेक्षित दृष्टा,'* अभिनव प्रकाशन, पुणे.
खोले, विलास {२००८}, *'महर्षी धोंडो केशव कर्वे,'* मंगेश प्रकाशन, मुंबई.
तेरणीकर, सुलभा {२००८}, *'गाथा शतकाची, महर्षी कर्वे शिक्षणसंस्था,'* कर्वे नगर, पुणे.
देशपांडे, मालती {२००८}, *'स्त्री शिक्षणाचे प्रणेते महर्षी कर्वे,'* मैत्रेय प्रकाशन, मुंबई.
फडके, य. दी. {१९८१}, *'र. धो. कर्वे'* ह. वि. मोरे प्रकाशन, पुणे.
Karve, Vikram (1968), '*Maharshi Karve Books on History Life and Times*', Hingne Street Shikshan Sanstha, Pune.
Paitha, Prabhakara (), '*Bharatratna Maharshi Karve*'Balaji Prakashan, Kolhapur.
Fedrik, Gold (1936), '*Looking Back: An Autobiography*' by D. K. Karve With a Preface' Pune.

संशोधक　　　　　　　　　　मार्गदर्शक

राजेंद्र रामचंद्र गव्हाणे　　　　　　　　　　डॉ. बिभीषण करे

मोतीलाल हरगोविंददास महाविद्यालय, ठाणे {प.}